।। श्री साईनाथ ।।

श्री साई शक ४४

# श्री खंडोबाचे नवरात्र

सालाबादप्रमाणे श्री खंडोबाचे नवरात्र अनुष्ठान शुक्रवार दि.२१ नोव्हेंबर २०२५ रोजी मांडावे. या दिवशी घरात गोमूत्र सिंचन करावे. पूजनाची जागा गोमूत्राने स्वच्छ करून घ्यावी. हळदीकुंकवाचे स्वस्तिक (卐) काढून त्यावर पाट मांडावा, पाटावर हळदीकुंकवाचे पृथ्वीतत्व (✡)काढावे. त्यावर ताम्हन ठेवून त्यात अक्षता घालून त्यावर हळदीकुंकवाचे पृथ्वीतत्व (✡)काढावे. वरील ताम्हनात आपल्याकडील तीन प्रतिमा व नारायणी प्रतिमा यांना पंचामृताने स्नान घालून त्या प्रतिमा वरील ताम्हनातील अक्षतावर ठेवून गंध, फूल, हळदीकुंकु वाहावे. उदबत्ती, निरांजन, दूध साखरेचा नैवेद्य दाखवावा. नंतर आरती म्हणावी. त्यानंतर मंगलाचरण (सजयती), श्री शक्तिपीठ प्रार्थना, दैनंदिन प्रार्थना व २१ वेळा महामंत्र (सर्व मंगल मांगल्ये) म्हणावा. सायंकाळी निरांजन, अगरबत्ती व दूध साखरेचा नैवेद्य दाखवावा व आरती म्हणावी. अनुष्ठानासमोर पानसुपारीचा विडा रूपये ११.०० दक्षिणा, १ नारळ, गूळ-खोबरे (तसेच खोबरे व १ चमचा हळद) ठेवावे.

दि.२७ नोव्हेंबर २०२५ गुरुवार रोजी अनुष्ठान उचलावे, पहिल्या दिवशी ठेवलेले खोबरे व गूळ घरात प्रसाद म्हणून घ्यावा. तसेच नारळ पण प्रसाद म्हणून घ्यावा. विडा दक्षिणा कार्यकेंद्रावर आणून ठेवावी.

नोंद : १) गुळ-खोबरे : पहिल्या दिवशी प्रसाद म्हणून वापरावे

२) हळद (भंडारा) खोबरे : चंपाषष्टीला सुर्याला भंडारा वाहून त्याच दिवशी घरात प्रसाद म्हणून वापरावे.

।।शुभं भवतु।।

सूचना : ज्यांचे कुलदैवत श्री खंडोबा आहे त्यांनीच फक्त हे अनुष्ठान मांडावे. इतर भक्तभाविकांना हे अनुष्ठान मांडणे ऐच्छिक आहे.

**चंपाषष्ठी – तळीआरती :** दि.२६ नोव्हेंबर २०२५ बुधवार **सकाळी (कार्यकेंद्रावर)**